साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

डॉ. गाडे

# तिफण

वर्ष १२ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

UGC Care Listed Journal


ISSN 2231 - 573X

● संपादक ●

## डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३.
मो. ९९०४००३९९८

Scanned with OKEN Scanner



# क्रांतिकारी भीमगीतांचे रचनाकार – वामनदादा कर्डक

- प्रा. डॉ. बी. पी. गार्डी
अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर

---

वामनदादांची बहुतांश गीते ही लोकगीते आहेत त्यांच्या गीतांवर महाराष्ट्रातील अनेक कविमने पोसली आहेत वामनदादांची गीते म्हणजे कोंडलेल्या मनाचा हुंकार आहे. अनेक गीतांमधील लोकजीवनाच्या प्रतिमा कर्डकांच्या साधनेची साक्ष देतात. वामनदादांच्या काव्यनिर्मितीचा केंद्रबिंदू मानव होता. मानवता, क्षमता, बंधुभाव, शील, करुणा, मैत्री या तत्त्वांवर दादांची लोकगीते आधारित आहेत आंबेडकरी भक्ती, दलित, शोषित, स्त्रीमुक्ती, जातिव्यवस्था, मनोरंजनातून प्रबोधन या विषयावरही दादांची लोकगीते आजही प्रभावी वाटतात. चळवळीच्या अशा असंख्य गाण्यांबरोबरच दादांनी पर्यावरण, हुंडाबंदी, ऊसतोड कामगार, दुष्काळ अशा भिन्न विषयांवर मोठ्या प्रमाणात लेखन केले आहे.

वामनदादा कर्डकांची भीमगीते आंबेडकर जयंतीचा अविभाज्य घटक झालीत. ही गीते सामान्य माणसाच्या मनाला भावलीत. वामनदादांनी लिहिलेल्या गाण्यात असे कोणते रसायन आहे की ज्याने माणसाचे रुपांतर भीमसैनिकात होते हे पाहण्यासाठी त्यांच्या गीतांवरून नुसती नजर फिरवली तरी ध्यानी येतेकी ही लोकांची बोली आहे, हा लोकांचा आवाज आहे, अन वेदनेचा हुंकारही आहे आणि हा आंबेडकरी जनतेचा बुलंद नारा आहे !

गेयता हे वामनदादांच्या कवितेचे नैसर्गिक आणि रसाळ अंग होते त्यांच्या क्रांतिकारी कवितांना नादमाधुर्याची अद्भुत देणगी लाभली होती. वामनदादा सर्वसामान्य दलितांची कैफियत मांडताना सर्वांना एकाच पंक्तीत मांडतात.'आपली मोजदादच मुळी गुलामात होती अन'आहे रे' वर्गाला सलाम ठोकण्यात सारी हयात गेली होती !' मात्र केवळ आपल्या पायात असणाऱ्याच नव्हे तर मनामनात वास करून असणारया गुलामगिरीच्या बेडया तोडणे केवळ बाबासाहेबांच्यामुळे शक्य झाले असं ते सहजतेने लिहून जातात. बाबासाहेबांच्या रूपाने हजारो वर्षांपासून विषमतेच्या अंधारात खितपत पडलेल्या दिनदलितांच्या आयुष्यात नवी पहाट उगवली आणि विकासाची वाट या उपेक्षित जनतेच्या दृष्टीपथात आली. आंबेडकरांनी आपल्या करंगळीला धरून अख्खा समाज ह्या पायवाटेवर आणला अन बघता बघता ह्या पायवाटेचे रुपांतर विकासाच्या विशाल महामार्गात झाले. याचा काव्यमय उल्लेख वामनदादा इथे करतात.

वामनदादांनी लिहिलेल्या भीमगीतांत कोणते गाणे अधिक लोकप्रिय आहे हे निश्चित करणे कठीण आहे, कारण जवळपास सर्वच गीते रसिकांच्या ओठी असतात. अनेकदा ही गाणी आपल्या कानी पडतात.

'तुफानातले दिवे आम्ही तुफानातले दिवे
तुफान वारा पाऊस धारा मुळी न आम्हा शिवे.
हल्ल्यावरती होती हल्ले अभंग अमुचे बाले किल्ले
असाच ताठर माथा अमुचा जरा न खाली लवे

याशिवाय आपला हक्क मागणारी 'आमचा वाटा' ही कविता त्यांनी लिहिली. तिला चळवळीत गायले जाऊं लागले. 'आमचा



Scanned with OKEN Scanner

वाटा' ह्या कवितेला ठेका आहे ताल आहे आणि त्यातलं मागणं हे आर्जवाचं नसून हक्काचं आहे त्यामुळे गाणाऱ्याच्या आवाजात रग आणि मनात त्वेष साहजिकच उत्पन्न होतो.

'सांगा आम्हाला बिर्ला बाटा टाटा कुठाय हो?
सांगा धनाचा साठा आमचा वाटा कुठाय हो?
घाम शेतात आमचा गळे, चोर ऐतच घेऊन पळे
धन चोरांचा हा पळण्याचा फाटा कुठाय हो?

आंबेडकरी चळवळीत देखील मतभेद होऊ लागले तेंव्हा वामनदादांना राहवले नाही आणि त्यांनी एक अत्यंत तेजस्वी कविता लिहिली. त्यात ते म्हणतात की बाबासाहेबांच्या मताचे मोजके लोक जरी सोबत असते तरी इतिहास बदलला असता..

भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते
तलवारीचे तयाचे न्यारेच टोक असते.

वामन कर्डकांना समाजमनाची नेमकी जाण होती, त्यामुळेच 'दिनांच्या चाकरीसाठी' या कवितेत त्यांनी लिहिले आहे - बाबासाहेबांकडे काय मागितले तर उद्धार होऊ शकतो याचे मार्मिक वर्णन या कवितेत आहे –

'भिकारी होऊनी दारी तुझ्या मी दान मागावे
दीनांच्या चाकरीसाठी तुझे इमान मागावे
उपाशी जीव हे कोटी तयांची भूक भागावी
कशासाठी तुझ्याकडचे भीमाचे ज्ञान मागावे.

बाबासाहेबांना उद्देशून वामनदादा लिहितात - ही कविता वेगळया धाटणीची आहे, बाबासाहेबांवर प्रेम करणाऱ्या व्यक्तीच्या डोळयात पाणी आणण्याचे सामर्थ्य ह्या कवितेत आहे, यावरून बाबासाहेबांचे जनमनातील अढळ स्थान लक्षात येण्यास मदत होते.

'समाधीकडे त्या वाट हि वळावी
तिथे आसवांची फुले हि गळावी

प्रत्येक आंबेडकरी अनुयायाचे स्वप्न असते की बाबासाहेबांचा जन्म जिथे झाला, वास्तव्य झाले, महानिर्वाण झाले तिथे एकदातरी जाऊन यावे. कर्डकदेखील त्याला अपवाद नव्हते, ते महूला जाऊन आले खरे मात्र तिथे गेल्यावर त्यांच्या मनात भावनांचा काय कल्लोळ माजला तो त्यांनी अप्रतिम शब्दांत काव्यबद्ध केला–

'भीमा तुझ्या महूला जाऊन काल आलो
तू जन्मल्या ठिकाणी, राहून काल आलो
तू रांग्लास जेथे, तेथेच मान झुकली
ती धूळ मी कपाळी, लावून काल आलो

आपल्या मातेनंतर भिमाई हीच आपली आई झाली असं मायेचं नातं ते कवितेत सहजतने लिहितात. बाबासाहेब हे त्यांच्या कोट्यावधी अनुयायांसाठी माऊली बनले आहेत याची महती सांगणारी ही कविता भावनात्मक दृष्टीतून लिहिलेली आहे.

'गेली आई भिमाई , झालीस तूच आई
आई तुला कसा गं, पान्हाच येत नाही|| धृ ||
आई तुझ्या दुधाने ,हि भूक जायीन गं
हि भूक , माझ्या पोटात मायीना गं || १ ||

वामन कर्डक नित्य वापराच्या शब्दांतून अर्थवाही कविता लिहितात. शब्दलालित्य, छंद वा कृत्रिम काव्यसौंदर्य यावर अजिबात भर न देता दैनंदिन जीवनातील शब्द ते कवितेत वापरत. त्यामुळे त्यांची कविता एका जीवनानुभावाचे रूप घेते.. आपल्याला जाण कधी आली अन आपल्याला जीवन कधी - कसे कळू लागले याचे रसाळ वर्णन त्यांनी केले आहे.



Scanned with OKEN Scanner

'केस माझे हे जेव्हा गळू लागले

तेव्हा जीवन मला हे कळू लागले...

एक काळ होता जेंव्हा समाजात पराकोटीची विषमता होती, अस्पृश्यता पाळली जात होती. दारिद्र्य अन दास्यत्वाच्या अंधःकारात दलित समाज हजारो वर्षे खितपत पडला होता. काळीज पिळवटून टाकणाऱ्या या सामाजिक विषमतेचं तितकंच टोकदार वर्णन कर्डकांनी या कवितेत केले आहे

लयी नाही मागत भर माझं

इवलंसं गाडगं, पाणी वाढ गं,

या गीतांतून त्यानी आपली व्यथा अशी मांडली आहे की वाचणाऱ्याच्या डोळा पाणी यावे ! समाजात एकी न ठेवता आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी दुही वाजवून आंबेडकरी विचारांची प्रतारणा करणाऱ्या लोकांवर ते सर्वशक्तिनिशी शब्दांचा आसूड चालवतात. बाबासाहेबांनी दिन दलितांच्या उद्धारासाठी आपले आयुष्य वेचले मात्र त्यांच्या विचारांचे वारसदार म्हणवून घेणाऱ्यांनी स्वतःच्या स्वार्थापायी या आंबेडकरी क्रांतीच्या तटबंदीस सुरुंग लावला अत्यंतिक वेदनेतून ही कविता प्रसवली आहे त्यामुळे तिचा आशय अर्थातच अणकुचीदार झाला आहे.

'काल भीमाच्या क्रांतीचे

तुम्हीच बारा वाजविले ॥ धृ ॥

काल आम्ही लढनारांनी

कडे कडे चढनारांनी

बंड भीमाचे गाजविले ॥ १ ॥

इतकं झाल्यावर मग ते सवाल करतात आणि जणू चळवळीत सामील होण्यासाठी ते आवाहनच करतात. बधीर झालेल्या मनाला हलवून टाकण्याचे सामर्थ्य या कवितेत आहे. क्रांतीसाठी काय काय करावे लागणार आहे याचे अप्रत्यक्ष कथन त्यांनी इथे केलेय - आंबेडकरी क्रांती घडण्यासाठी सगळ्यांनी मिळून लढा उभारणे गरजेचे आहे त्यात सर्वस्व झोकून काम करावे लागणार आहे , तर ती क्रांती शक्य होणार आहे. सारेच जण असं वागले अन ही क्रांती यशस्वी झाली तर समाजात काय चित्र तयार होईल याचे खुमासदार पण स्वाभिमान जागृत करणारे शब्दांकन त्यांनी या कवितेत केलेय मात्र जातीयतेचा फणा काढणाऱ्यास कसे ठेचायचे हे देखील ही कविता सांगते–

काल मुजरेच केले रे माझ्या मेलेल्या बापाने

आज मुजरे मला करती भीमाच्या प्रतापाने ....

गेली सारीच लाचारी आज दिल्लीच्या दरबारी

मला नेउन बसविले सात कोटीच्या बापाने....

गावाकडच्या जीवनात अनेक साध्यासुध्या समस्या येत राहतात मात्र या आयुष्याला सामोऱ्या जाणाऱ्या लहानग्यांपासून ते महिलांपर्यंत प्रत्येकाला कसा संघर्ष करावा लागतो याचं वेधक चित्रण त्यांनी आपल्या कवितेत केले आहे-सासुरवाशिणीने केलेलं आपल्या माहेराचे वर्णन आपल्या अंतःकरणाला स्पर्श करून जाते. या कवितेतून वेगळेच वामनदादा आपल्या भेटीस येतात जे निसर्गावर प्रेम करतात. आपल्या अनोख्या प्रवाही रंगतदार शैलीत या निसर्गाला चितारत जातात. या निसर्ग कवितेस त्यांनी सासरी असलेल्या नववधूच्या आठवणीत गुंफून त्यास भावनात्मकतेची जोड दिली आहे.

'नदीच्या पल्हाड बाई , झाडी लई दाट

तिथूनच जाई माझ्या माहेरची वाट

प्रत्येक स्त्रीला माहेराची ओढ असणे जितके साहजिक असते तद्वतच तिला आपल्या सासरी आपल्या पतीचा सर्वात जास्त आधार वाटणे हे स्वाभाविक असते. मात्र तिच्या सासरी सारे काही आलबेल नसेल तर मात्र तिची अवस्था अत्यंत बिकट होते. तिच्या कष्टाला पारावार राहत नाही अन तिच्या दुर्दैवाचे दशावतार सुरु राहतात. अशा स्त्रीमनाचं अचूक वेध घेणारं चित्रण कर्डक आपल्या कवितेतून करतात.



Scanned with OKEN Scanner

'वागने बाई नीट नाही भरताराची,
आईच्या घराची याद येई माहेराची

अशा विविध आशयाच्या कविता लिहितानाच त्यांनी व्यसनमुक्तीचे गांभीर्य ओळखून एक कविता लिहिली आहे पिचलेला गोरगरीब माणूस त्याच्या वैफल्यामुळे म्हणा की अन्य कारणामुळे म्हणा त्याच्या जीवनातील संघर्षावर उतारा म्हणून दारुच्या आहारी गेलेला आजही पहायावायास मिळतो. एकेकाळी हे प्रमाण अक्राळविक्राळ स्वरूपात होते. यावर उपाय म्हणून कान टोचणी करणारी कविता ही वामनदादांनी लिहिली.

वामनादादांनी आपल्या आयुष्यात सुमारे पाच ते सहा हजार मराठी हिंदी गीतांचे लेखन केलेले आहे. जवळ जवळ पाच हजारापर्यंत गीते केवळ बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्व जीवन,कार्य,तत्वज्ञान, चळवळ यावर लिहिलेली आहेत. बाबासाहेबांच्या सर्व पैलूंचे दर्शन त्यांनीया गीतांमधून करून दिलेले आहे.

**संदर्भ ग्रंथ:**


१. आंबेडकरी प्रतिभेचा महाकवी : वामनदादा कर्डक – डॉ.अशोक जोंधळे, डॉ. शत्रुघ्न जाधव
२. आंबेडकरवादी महागीतकार : वामनदादा कर्डक – डॉ. यशवंत मनोहर
३. वाटचाल – वामनदादा कर्डक
४. मोहळ – वामनदादा कर्डक
५. हे गीत वामनाचे - वामनदादा कर्डक


◆◆◆◆◆



Scanned with OKEN Scanner